जिल्हा परिषद शाळा विकासाचा १६ कलमी कार्यक्रम अंमलबजावणी

शिक्षण विभाग (प्राथमिक)
जिल्हा परिषद, जळगांव

- जिल्हा परिषद शाळा विकासाचा १६ कलमी कार्यक्रमांची संकल्पना मा. डॉ. श्री. पंकज आशिया सो., मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.जळगांव यांची आहे.
- सदरील १६ कलमी कार्यक्रमाची सुरुवात दि. ५ सप्टेंबर २०२१ रोजी " **शिक्षक दिनाच्या** " दिवशी सुरुवात करण्यात आली.
- या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामपंचायत, जिल्हा नियोजन कार्यालय, एम.आर.ई.जी.एस., समग्र शिक्षा व डायट जळगाव या विभागांमध्ये समन्वय साधून अंमलबजावणी करण्यात येत आहे.

उद्दिष्ट

- जिल्हा परिषद शाळा विकासाचा १६ कलमी कार्यक्रम हाती घेण्याची उदिष्टये .....

- **सर्व शाळांना भौतिक सुविधा प्राप्त करुन देणे.**
- **विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीस हातभार लावणे.**
- **जि.प.शाळांकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणे.**
- **ग्रामिण भागातील विदयार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळणे.**
- **जि.प.शाळांसाठी लोकसहभागातून निधी उपलब्ध करणेसाठी प्रयत्न करणे.**

१६ कलमी कार्यक्रम अंमलबजावणी

शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, जळगांव

अ.क्र.	मुद्दा
1	मुलांचे स्वच्छतागृह
	मुलींचे स्वच्छतागृह
2	संरक्षण भिंत
3	हॅडवॉश स्टेशन
4	बाला पेंटींग
5	रेन वॉटर हारवेस्टींग
6	किचन गार्डन व वृक्ष लागवड
7	कार्यरत विज पुरवठा
8	सेमी इंग्रजी
9	ग्रंथालय, खेळाचे साहित्य
10	व्ही-स्कुल आणि संगणक
11	स्थानिक मदत / लोकसहभाग
12	अंगणवाडी

१६ कलमी कार्यक्रमातील

मुद्दा क्र.१ मुलां- मुलींचे स्वच्छतागृह

जिल्ह्यातील जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या एकूण ५२२ शाळां मध्ये स्वच्छतागृह आवश्यक आहेत त्या साठी जिल्हा नियोजन कार्यालया मार्फत निधीची तरतूद करण्यात आलेली आहे त्या करिता १३३ स्वच्छतागृहाना टी.एस. देण्याची व १२२ स्वच्छतागृहाना प्र.मा. देण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे

१६ कलमी कार्यक्रमातील

मुद्दा क्र. २ संरक्षण भिंत

जिल्ह्यातील जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या एकूण ७६२ शाळां मध्ये **संरक्षण भिंत** आवश्यक आहेत त्या साठी जिल्हा नियोजन व एम.आर.ई.जी.एस. कार्यालया मार्फत निधीची तरतूद करण्यात आलेली आहे त्या करिता २१५ **संरक्षण भिंत** टी.एस. देण्याची व १८६ **संरक्षण भिंत** प्र.मा. देण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे, त्या पैकी १०१ शाळातील संरक्षण भिंती बांधून पूर्ण झाल्या आहेत.

१६ कलमी कार्यक्रमातील
मुद्दा क्र. ३ हॅंडवॉश स्टेशन

जिल्ह्यातील जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या एकूण ११४५ शाळां मध्ये हॅंडवॉश स्टेशनची आवश्यक आहेत त्या साठी जिल्हा नियोजन कार्यालया मार्फत निधीची तरतूद करण्यात आलेली आहे आता पर्यंत १४४ हॅंडवॉश स्टेशनला टी.एस. देण्याची व १२३ हॅंडवॉश स्टेशनला प्र.मा. देण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे.



१६ कलमी कार्यक्रमातील
मुद्दा क्र. ४ बाला पेंटींग

जिल्ह्यातील जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या एकूण १८२१ शाळां पैकी प्रायोगिक तत्वावर जिल्ह्यातील ३५ शाळाची बाला पेंटींगसाठी निवड करण्यात आली आहे
त्या साठी जिल्हा नियोजन कार्यालया मार्फत निधीची तरतूद करण्यात आलेली आहे
त्या नुसार आता पर्यंत १९ शाळांचे काम पूर्ण झाले आहे

१६ कलमी कार्यक्रमातील
मुद्दा क्र. ५ रेन वॉटर हारवेस्टींग

जिल्ह्यातील जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या एकूण १२४१ शाळांना रेन वॉटर हारवेस्टींगची आवश्यक आहे त्यासाठी जिल्हा नियोजन कार्यालया मार्फत निधीची तरतूद करण्यात आलेली आहे त्या नुसार आता पर्यंत ५६ शाळांचे काम पूर्ण झाले आहे.

१६ कलमी कार्यक्रमातील

मुद्दा क्र. ६ किचन गार्डन व वृक्ष लागवड

जिल्ह्यातील जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या एकूण १००४ शाळांना किचन गार्डन व वृक्ष लागवडची आवश्यक आहे त्यासाठी लोकसहभागातुन आता पर्यंत ४७७ शाळांमध्ये किचन गार्डन व वृक्ष लागवडचे काम पूर्ण झाले आहे.

१६ कलमी कार्यक्रमातील

मुद्दा क्र. ७ कार्यरत विज पुरवठा

जिल्ह्यातील जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या एकूण ५५८ शाळांना विज पुरवठा आवश्यक आहे पैकी १०० शाळांना मानव विकास कार्यक्रम अंतर्गत सोलर पॅनल पुरविण्यात येणार आहे व उर्वरित शाळेचे थकीत वीज बिल लोकसहभागातुन भरण्यात येणार आहे.

१६ कलमी कार्यक्रमातील

मुद्दा क्र. ८ सेमी इंग्रजी

जिल्ह्यातील जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या एकूण ३८९ शाळांमध्ये सेमी इंग्रजी मध्यमाचे वर्ग सुरु करण्याचे उद्धिष्ट ठेवण्यात आले असून पैकी १८८ शाळांमध्ये सेमी इंग्रजी मध्यमाचे वर्ग सुरु झाले आहेत.

१६ कलमी कार्यक्रमातील

मुद्दा क्र. ९ ग्रंथालय, खेळाचे साहित्य

जिल्ह्यातील जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या एकूण ३८९ शाळांमध्ये सेमी इंग्रजी मध्यमाचे वर्ग सुरु करण्याचे उद्धिष्ट ठेवण्यात आले असून पैकी १८८ शाळांमध्ये सेमी इंग्रजी मध्यमाचे वर्ग सुरु झाले आहेत.

१६ कलमी कार्यक्रमातील

मुद्दा क्र. १० व्ही-स्कुल आणि संगणक

कोविड १९ मुळे शालेय शिक्षणातील अळथडे व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यावर उपाय करण्यासाठी व्ही-स्कूल अँप तयार करण्यात आले आहे याचा जळगाव जिह्यातील १०२०८८ विद्यार्थी लाभ घेत आहे.

१६ कलमी कार्यक्रमातील

मुद्दा क्र. ११ स्थानिक मदत / लोकसहभाग

शाळेतील विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळण्या करिता गावातील दानशूर , शिक्षणप्रेमी, समाज सेवक नागरिकांच्या सहकार्यातून जिल्ह्यातील शाळांना रक्कम रु.१८६१८०२/- एवढा निधी प्राप्त झाला असून त्यातून डिजिटल शाळा निर्मितीची कार्यवाही करण्यात येत आहे.

१६ कलमी कार्यक्रमातील

मुद्दा क्र. १२ अंगणवाडी

नवीन शैक्षणिक धोरणाचा भाग म्हणून जिल्ह्यातील जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या शाळांच्या ५०० मीटर परिसरात असलेल्या अंगणवाड्या शाळेतील अतिरिक्त शाळांमध्ये भरविण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे. उपलब्ध माहिती नुसार जिल्ह्यात २१७ शाळा व अंगणवाडी यांचे एकत्रीकरण करण्यात येणार आहे.